**विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. ( वैद्यकीय साहीत्य पुरवठा करणेबाबत. )**

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४ /कोरोना/सीआर-
दि. २२/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्यानुसार मी डॉ.विपीन इटनकर, (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी, नांदेड जिल्हयात करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेसाठी आवश्यक साहीत्याचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, नांदेड यांनी नांदेड जिल्हयातील सर्व होलसेल व किरकोळ औषधी/वैद्यकीय साहीत्य विक्रेते यांचेकडील कोरोना विषाणू प्रतिबंधासाठी आवश्यक वैद्यकीय साहीत्य (उदा.मास्क, सॅनिटायजर व इतर तत्सम साहीत्य ) इत्यादींचा साठा पोलीस विभाग यांचे मदतीने हस्तगत करुन अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे व्दारा निर्गमित अधिसुचना दिनांक २१ मार्च २०२० मध्ये निश्चित केलेल्या दरा नुसार अधीष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड, जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करीत आहे.

तसेच, सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधिता विरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार व इतर अनुषंगीक कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेशास तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, नांदेड

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) अधीष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड,
५) अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोसिएशन, नांदेड
६) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
८) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,नांदेड
९) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
११) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत, जि.नांदेड
१२) सर्व संबंधितास

जिल्हादंडाधिकारी, नांदेड